# आत्ताचे बोला!

पन्नास वर्षांनंतर पृथ्वीच्या वातावरणाचे तापमान अमूक इतके वाढणार, शंभर वर्षांनंतर इतका भाग पाण्याखाली जाणार, इतके जीव नष्ट होणार... हवामानाबाबत आजकाल जी भाकिते दिली जातात, त्यात पुढील पन्नास-शंभर वर्षांनंतरच्या स्थितीबाबत बोलले जाते किंवा त्याच्याही पुढच्या काळात हवामान कसे असेल याबाबतही सांगितले जाते. इतक्या पुढे काय होणार हे सांगितले जात आहे हे ठीक आहे, पण नजीकच्या काळात म्हणजे पुढील पाच, दहा, पंधरा वर्षांमध्ये नेमके काय घडणार आहे हे सांगावे, अशी लोकांची अपेक्षा आहे. कारण शंभर वर्षांनंतर हवामानात नेमके काय घडणार हे पाहण्यासाठी आपल्यापैकी फारच थोडेजण असतील. त्यामुळे हवामानाबाबतची भाकिते खरी ठरली का, हेही समजणार नाही. मात्र पुढील दहा-वीस वर्षांमध्ये काय घडणार याबाबत सविस्तर अंदाज दिला तर ते प्रत्यक्षात घडते का, याचा प्रत्यय आताच्या बहुसंख्य लोकांना घेता येऊ शकेल. त्यामुळेच लांबच्या काळातील अंदाजाबाबत बोलताना येत्या काही वर्षांमध्ये हवामानात नेमके काय बदल होतील हे सांगणे आवश्यक आहे. सध्या जगभरात हवामानाचे विविध अंदाज दिले जातात. पाऊस, चक्रीवादळे, उष्णतेच्या लाटा, हिमवृष्टी याबाबत हे अंदाज असतात. त्यापैकी हंगामात किती पाऊस पडेल, चक्रीवादळांची संख्या किती असेल याबाबतचे अनेक अंदाज फसतात. अमेरिकेतही हंगामात चक्रीवादळांची संख्या किती असेल हे अंदाज मोठ्या प्रमाणात फसले आहेत. याशिवाय भारतातील आणि इतरही भागातील पावसाचे अंदाजही अनेकदा चुकल्याचे पाहायला मिळते. त्यामुळेच आपले काही महिन्यांनंतरचे हवामानाचे अंदाज चुकत असतील तर पन्नास आणि शंभर वर्षांनंतरचे अंदाज कसे बरोबर ठरणार, असा प्रश्नही विचारण्यात येत आहे. हवामानबदलाबाबत भाकिते देणाऱ्यांना या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील, अन्यथा त्यांच्या भाकितांवर लोकांचा विश्वास कसा बसणार?



प्रश्न- सध्या जगातील हवामानाचे काही अंदाज चुकत आहेत हे खरे आहे का?

(उत्तर- रविवार,१२ ऑक्टोबरच्या अंकात)



MAHARASHTRA

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

प्रस्तुत

लोकसत्ता गाथा ज्ञानाची




पाणी नसेल तेव्हा पाण्याचा एक-एक थेंब सुध्दा अनमोल ठरु शकतो

म्हणून पाणी वाचवा

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

Website: http://mpcb.mah.nic.in

दर गुरुवारी सकाळी ७.४० वा. आकाशवाणीच्या अस्मिता वाहिनीवर 'जागर पर्यावरणाचा' कार्यक्रम ऐका.